सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : १४७७[२]/२०२२/वीस** **दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२३**

# :-प्रसिध्दीपत्रक:-

**विषय :-** राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२, गुण, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत

**संदर्भ :-** १) पूर्व परीक्षा जाहिरात क्र. ४५/२०२२, दि. ११ मे, २०२२ व मुख्य परीक्षा अधिसूचना क्रमांक ९९/२०२२, दि. ११ नोव्हेंबर, २०२२.
२) आयोगाचे क्र. १४४७(२)/२०२२/वीस दिनांक ११ऑक्टोबर, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २१, २२ व २३ जानेवारी, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२२ च्या लेखी परीक्षेचा निकाल ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

**२.** सदर निकालाद्वारे मुलाखतीकरिता पात्र न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील View अंतर्गत ३० दिवसांच्या कालावधीकरीता उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करू इच्छिणा-या उमेदवारांना फेरपडताळणीकरिता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्काह अर्ज सादर करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(३) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(४) उपलब्ध होणा-या गुणपत्रकातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करुन 'Save'बटनवर क्लिक करावे.

(५) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

**३.** गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक दिनांक २८ ऑक्टोबर, २०२३ ते दिनांक ६ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**४.**उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधता येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव
(परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.